क्र.कक्ष-4/सीसीटीएनएस प्रकल्प/जनरेटर युपीएस देख.दुरुस्ती/एएमसी/2022-[illegible] सोलापूर शहर, दि.12-01-2023

विषय :- सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे संदर्भात देखभाल, दुरुस्ती वार्षिक दरकरार बाबत.

संदर्भ :- वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांचेकडील जा.क्र.गुन्हे/3627/2022, दि.14-09-2022.

---**---

आदेश :-

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन, पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवरील सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवरील सात पोलीस ठाणे व वरिष्ठ कार्यालय येथील जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे करीता वार्षिक दर करार (Annual Maintainence Contract) करणेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सदरकामी **सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावरुन** सिलबंद दरपत्रके मागविण्यात येणार आहेत. त्याकरीता सोबतचे प्रसिध्दीपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

मा.पोलीस आयुक्त
यांचे मान्यतेने.

( अजित बो-हाडे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता.

| गुन्हेशाखा, सोलापूर शहर. | |
|---|---|
| व.पो.नि.गुन्हेशाखा | |
| दिनांक व वेळ | 13/1/2023 13/20 |
| अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | CCTNS |
| ... क्रमांक | |

प्रति,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा (सीसीटीएनएस), सोलापूर शहर.

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

-: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जनरेटर
व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे-
देखभाल, दुरुस्ती वार्षिक दरकरार बाबत.

---**---

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवरील सात पोलीस ठाणे व वरिष्ठ कार्यालय येथे सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेले जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे संदर्भात देखभाल दुरुस्ती करीता वार्षिक दर करार (Annual Maintenance Contract) करणेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेले जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे संदर्भात देखभाल दुरुस्ती करीता **प्रतिनग सर्व करासह दर नमुद करुन** सदर सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर बाबत खालील अटी व शर्तीचे लागू राहणार आहेत.

| | |
|---|---|
| 1 | दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र/ पॅनकार्ड/ जीएसटी प्रमाणपत्र/ आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. |
| 2 | काळ्या यादीत असणारे व्यापारी यांनी दरपत्रके सादर करु नयेत. |
| 3 | गुन्हे दाखल असणारे व्यापारी यांनी दरपत्रके सादर करु नयेत. |
| 4 | दरपत्रकामध्ये करासहित सर्व खर्चाचा समावेश असावा. |
| 5 | जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे संदर्भात दुरुस्ती देखभाल या कामाची पुर्तता झाल्यानंतर तसेच शासकीय अनुदान प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल. |
| 6 | प्रसिध्दीपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यानंतर सिलबंद दरपत्रके सादर करणेसाठी 07 दिवस मुदत राहिल. |
| 7 | उपलब्ध जनरेटर व युपीएस पैकी बहुतांश नमुद उपकरणाची वॉरंटी कालावधी संपलेला आहे. |
| 8 | मंजूर कंत्राटदाराने नियमित देखभाल दुरुस्ती बरोबरच कोणत्याही वेळी जनरेटर व युपीएस नादुरुस्त झाल्याचे कळविल्यास दुरुस्तीसाठी हजर राहणे बंधनकारक आहे. |
| 9 | जनरेटर व युपीएस दुरुस्ती / नवीन जोडणी करणे ही कामेही करणे बंधनकारक आहे. |
| 10 | दरपत्रकात नमुद उच्च दर्जाचेच साहित्य पुरवठा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |
| 11 | दरपत्रकात नमुद दर मंजुर झालेनंतर कंत्राटदाराला प्रत्येक जनरेटर व युपीएस करीता History Sheet ठेवणे बंधनकारक राहील. नियमित देखभाल दुरुस्ती व केलेल्या दुरुस्ती कामांची नोंद सदर History Sheet मध्ये घेऊन त्यावर संबंधीत पोलीस अंमलदार यांची स्वाक्षरी घेऊन History Sheet च्या झेरॉक्स प्रतीसह पोलीस ठाणे / शाखा / विभाग निहाय बिले सादर करणे बंधनकारक राहील. |
| 12 | सदर कामाचे होणारे बिल हे पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापुर शहर यांना प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अदा केले जाईल. सदरचे बिल अदा करताना नियमाप्रमाणे टी.डी.एस. कपात केला जाईल. परंतु एखाद्या महिन्यात अनुदान उपलब्ध न झाल्यास सदर बिलावरती कोणतेही व्याज मागता येणार नाही. अनुदान उपलब्ध झाल्यास सदरचे बिल करण्यात येईल. |
| 13 | स्विकृत पुरवठादाराने दराबाबत व कामकाजाबाबत पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापुर शहर यांचे बरोबर रु.100/- स्टॅम्प पेपरवर नोटरीद्वारे करार करणे आणि सदर कराराचा खर्च हा संबंधीत कंत्राटदाराने करणे बंधनकारक आहे. |
| 14 | सदर दरकराराबाबत पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांचा निर्णय अंतिम राहील. |
| 15 | सिलबंद दरपत्रक मुदतीत प्रबंधक शाखा कक्ष-4 कार्यासन, पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर येथे सादर करणे. |

**मा.पोलीस आयुक्त**
**यांचे मान्यतेने.**

( अजित बो-हाडे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता.